**<u>किरकोळ फौजदारी चौकशी अर्ज क्रमांक ४०५/२०१७ मधील निशाणी क्रमांक ४ वरील आदेश</u>.**

**१.** अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. संक्षिप्त मध्ये अर्जातील मजकूर असा की, अर्जदार क्रमांक १ व सामनेवाला हे पती पत्नी असून त्यांचे वैवाहिक संबंध आजतागायत कायम आहे. त्यांचा विवाह दिनांक १४/०५/२००६ रोजी मौजे शिर्डी येथे झाला होता. लग्न संबंधातून त्यांना अर्जदार क्रमांक २ प्रांजल व अर्जदार क्रमांक ३ श्रेया या मुली आहेत. सामनेवाला लग्नानंतर अर्जदारास सहा महिने चांगले वागविले व नंतर शिर्डी येथे जागा घेउन दुकान टाकून द्या किंवा व्यवसायासाठी पाच लाख द्या अशी मागणी सामनेवाला करु लागला. अर्जदार क्रमांक १ च्या आई वडिलांनी त्याला समजून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्याने काहीही ऐकले नाही तो अर्जदार क्रमांक १ हिस मारहान करणे, उपाशी पोटी ठेवणे बे रात्री घरातून हाकलून देणे, दारु पिउन क्षणोक्षणी अपमान करणे अशा प्रमाणे शारीरिक व मानसिक त्रास देउ लागले. दिनांक ०५/०५/२०१७ रोजी अर्जदार क्रमांक १ हिस मारहान व शिवीगाळ करुन तसेच तिला फक्त मुली झाल्या आहेत या कारणावरुन घरातून हाकलून दिले. त्यामुळे तिला तिच्या मुलींसह माहेरी राहणे भाग पडत आहे. सामनेवाल्यांनी तिची व तिच्या मुलींच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नाही. अर्जदारांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून सामनेवाला हा प्लॉटींगचा व्यवसाय करतो त्यापासून त्याला दरमहा १५ ते २० हजार मिळतात तसेच सामनेवालाची पाच ते सहा एकर बागायती शेती असून त्यापासून त्याला वार्षिक दहा लाख रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदारांनी त्यांना दर महा प्रत्यकी पाच हजार इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केली.

**२.** सामनेवालाने निशाणी क्रमांक ११ वर म्हणणे सादर केले अर्जास विरोध दर्शवला त्याने अर्जदार व त्यांच्या दरम्यान असलेले नातेसंबंध मान्य करुन अर्जातील इतर मजकूर नाकारुन त्याच्या म्हणण्याप्रमाणे लग्नानंतर अर्जदार ही नेहमी माहेरी जात होती व किरकोळ कारणांवरुन घ ारात वाद घालत असे. अर्जदार क्रमांक १ च्या सांगण्यावरुन सामनेवालेच्या वडिलांनी तिला श्रेया मॅचिंग व लेडीज वेयर हे कपडयाचे दुकान टाकून दिले. अर्जदार क्रमांक १ ने स्वत: सामनेवालाचा त्याग केला आहे व तिची सामनेवाला सोबत संसार करण्याची इच्छा नाही. तिने स्वत: सामनेवाला सोबत नांदण्यास नकार देउन घटस्फोटाची मागणी केली. सामनेवाला हा संगमनेर येथे अमर कतारी यांच्या कार्यालयामध्ये साफ सफाईचे काम करतो व त्यास केवळ २५००/- इतकाच पगार मिळतो. सामनेवालाचा मोटार अपघात होउन उजव्या हातास मार लागला होता त्यामुळे देखील त्याला अपंगत्व आले आहे व कोणतेही काम करणे होत नाही. या उलट अर्जदार हिस कपडयाच्या

व्यवसायात दरमहा २५ ते ३० हजार रूपये मिळतात. त्यामुळे तिला सामनेवालाकडून कोणत्याही पोटगीची आवश्यकता नाही सबब त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**३.** उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार क्रमांक १ हि सामनेवाल्याची पत्नी आहे व इतर अर्जदार हया त्याच्या मुली आहेत. सामनेवाल्याची त्यांना सांभाळण्याची नैतीक जबाबदारी असतांना देखील त्याने त्यांना त्रास देवून घराच्या बाहेर काढून दिले व त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नाही. सामनेवाल्याने अर्जदार व त्यांचे नातेसंबंध नाकारलेले नाहीत. त्याच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार ही स्वत: त्याचा त्याग करून निघून गेली आहे.

**४.** उभयपक्षांच्या कथनावरून अर्जदार व सामनेवाला हे एकत्र राहत नाहीत असे दिसून येते. सामनेवाला व अर्जदार यांनी एकमेकांविरूध्द केलेले आरोप अजून सिध्द होणे बाकी आहे. त्यांच्या आरोपामध्ये असलेली तथ्यता ही पुराव्याअंती स्पष्ट होणार आहे. परंतु सध्य स्थितीत प्रथमदर्शनी सामनेवाल्याची अर्जदार यांना सांभाळण्याची नैतिक जबाबदारी असताना देखील त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय सामनेवालाने केली नाही असे दिसून येत आहे. सामनेवाला हा कोणत्याही परिस्थितीत त्याची ही जबाबदारी टाळू शकत नाही.

**५.** अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे सामनेवाला हा प्लॉटिंगचा व्यवसाय करतो परंतु त्या संदंर्भात अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयासमोर सादर केलेला नाही. अर्जदाराने मौजे पिंपळगाव फुणगी ता. राहुरी, येथील गट नंबर ५३/१, गट नंबर २८ व गट नंबर ५१/९ चे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केले आहे. सदर ७/१२ उता-यांचे अवलोकन केले असता या जमिनी पैकी केवळ गट नंबर २८ मध्ये ३८ गुंठे क्षेत्र सामनेवाल्याचे नावावर आहे. अर्जदाराने सामनेवालास शेतीपासून वार्षिक दहा लाख उत्पन्न मिळते असे कथन केले आहे परंतु सामनेवाल्याच्या निश्चित उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर दिला नाही. परंतु सामनेवालाने स्वत: तो संगमनेर येथे साफ सफाईचे काम करतो असे कथन केले आहे. त्यामुळे सामनेवालास उत्पन्नाचे साधन आहे असे सध्य स्थितीत तरी म्हणता येईल. सामनेवाल्याने अर्जदार हिस कपडयाच्या व्यवसायातून उत्पन्न मिळते असे कथन केले आहे परंतु त्या संदंर्भात त्याने कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयासमोर सादर केला नाही. अशा परिस्थितीत अर्जदारांना उत्पन्नाचे साधन आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अर्जदार हे सामनेवाला पासून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरतात. प्राप्त परिस्थितीत सामनेवाल्याने अर्जदार क्रमांक १ हिस एक हजार रूपये व अर्जदार क्रमांक २ व ३ यांना प्रत्येकी पाचशे रूपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश करणे योग्य व न्यायाचे होणार आहे.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

१ अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२ सामनेवाला याने अर्जदार क्रमांक १ हिस दरमहा रक्कम रूपये १,०००/- व अर्जदार क्रमांक २ व ३ यांना प्रत्येकी रूपये ५००/- अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाचा निकाला लागेपावेतो देण्यात यावी.

(स्वाती भा. नाईकनवरे - गरड)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र. ३), राहाता.

दिनांक :- १७/१०/२०१८.